# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक १८०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.१३ जुलै २०२४ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## झालेल्या आरोपांवर माझे उत्तर समितीकडे सादर करणार-पूजा खेडकर

वाशिम दि.१२ (प्रतिनिधी)- प्रशिक्षणार्थी (प्रोबेशनरी) आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी यूपीएससीकडे खोटं दिव्यांग प्रमाणपत्र सादर केल्याचा आरोप त्यांच्यावर केला जातो आहे. याआरोपांची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारद्वारे एक सदस्यीय समितीदेखील स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे पूजा खेडकर यांच्या अडचणीत वाढ होऊ शकते, अशी चर्चा सुरू आहे.

पूजा खेडकर यांनी आज वाशिममध्ये माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना त्यांच्यावर झालेल्या आरोपांबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, सरकारी नियमांनुसार मी याविषयी माध्यमांशी बोलू शकत नाही. मला याविषयी बोलायची परवानगी नाही. मात्र, यासंदर्भात माझं जे काही उत्तर असेल, ते मी समितीकडे सादर करेन, अशी प्रतिक्रिया पूजा खेडकर यांनी दिली. पूजा खेडकर या सध्या चांगल्याच चर्चेत आहेत. आपल्या अधिकाराचा गैरवापर केल्यामुळे राज्य सरकारने त्यांची बदली केली आहे. याशिवाय यूपीएससी परीक्षा देताना त्यांनी दृष्टीदोष आणि मानसिक आजार असल्याचं खोटं प्रमाणपत्र सादर केल्याचा आरोपही त्यांच्यावर करण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे या आरोपांची चौकशी करण्यासाठी आता केंद्र सरकारने एकसदस्यीय समिती स्थापन केली आहे. येत्या दोन आठवड्यात या समितीला अहवाल सादर करण्यास सांगण्यात आलं आहे. या आरोपांना आता पूजा खेडकर उत्तर देणार आहेत.

# विधान परिषद निवडणूकीत महायुतीचा सर्वच ९ जागांवर विजय

## काँग्रेसची ८ मते फुटली; फडणवीसांचा मॅजिक पॅटर्न तिसऱ्यांदा यशस्वी

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- राज्यातील विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी पार पडलेल्या निवडणुकीचा निकाल शुक्रवारी संध्याकाळी जाहीर झाला. या निवडणुकीत महायुतीने बाजी मारल्याचे दिसून आले. ठाकरे गटाने शेवटच्या क्षणी मिलिंद नार्वेकर यांना रिंगणात उतरवल्याने विधानपरिषद निवडणूक चुरशीची झाली होती. लोकसभेतील यशामुळे मविआ आघाडी विधानपरिषद निवडणुकीत शिंदे गट आणि अजितदादा गटाच्या आमदारांची मतं फोडेल, अशी चर्चा होती. मात्र, ही अपेक्षा फोल ठरली आणि महायुतीने विधानपरिषद निवडणुकीत सर्वच्या सर्व ९ जागा जिंकून बाजी मारली आहे.

यापूर्वी १० जुन २०२२ ला राज्यसभा तर २० जुन २०२२ ला विधानपरिषदेच्या निवडणुकीत फडणवीसांनी आपला मॅजिक पॅटर्न वापरत मविआला धक्का दिला होता. त्यामुळे मविआ सरकार कोसळले होते. त्यामुळे आताच्या विधानपरिषदेच्या नियोजनाची आणि मतांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच होती. लोकसभेच्या निकाल ामुळे वातावरण बदलल्याने शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गट महायुतीच्या आमदारांची मतं फोडेल, अशी चर्चा होती. मात्र,

### विजयी उमेदवार

**भाजपा**
- पंकजा मुंडे – २६ (विजयी)
- परिणय फुके – २६ (विजयी)
- योगेश टिळेकर – २६ (विजयी)
- अमित गोरखे – २६ (विजयी)
- सदाभाऊ खोत – २६ (विजयी)

**शिवसेना एकनाथ शिंदे गट**
- भावना गवळी – २४ (विजयी)
- कृपाल तुमाने – २५ (विजयी)

**राष्ट्रवादी अजित पवार गट**
- राजेश विटेकर – २३ (विजयी)
- शिवाजीराव गर्जे – २४ (विजयी)

**महाविकास आघाडीचे उमेदवार**

**काँग्रेस** - * प्रज्ञा सातव – २५ (विजयी)

**शिवसेना उद्धव ठाकरे गट** - * मिलिंद नार्वेकर – २३ (विजयी)

**राष्ट्रवादी शरद पवार गट** - * जयंत पाटील (शेकाप) – १२ (पराभूत)

आज विधानपरिषद निवडणुकीचा निकाल समोर आल्यानंतर देवेंद्र फडणवीसांची जादू कायम असल्याचे दिसून आले. २०२२ ला राज्यसभा आणि विधानपरिषदेत विजयानंतर आज देवेंद्र फडणवीस यांनी विजयाची हॅट्रिक करुन दाखवली. विधानपरिषेदेच्या गणितांमध्ये फडणवीसांची बेरीज सर्वांवरच भारी पडल्याची चर्चा आता रंगली आहे. त्यांनी सलग पाच टर्म आमदार राहिलेल्या आणि शरद पवार पुरस्कृत उमेदवार असलेल्या जयंत पाटील यांना धोबीपछाड दिला आहे.

विधानपरिषद निवडणुकीत सुरुवातीपासूनच काँग्रेसची मतं फुटणार, अशी चर्चा होती. या निवडणुकीत अजित पवार गटाला दोन उमेदवार निवडून आणणे कठीण होते. त्यासाठी त्यांना अतिरिक्त मतांची गरज होती. विधानपरिषद निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात झाल्यावर शिवाजीराव गर्जे आणि राजेश विटेकर यांनी पहिल्या पसंतीची २३ मतं मिळवत विजय (पान ४ वर)

आज महायुतीसाठी आनंदाची गोष्ट आहे. आमचे नऊ उमेदवार निवडून आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही जेव्हा नऊ जागा लढवण्याचा निर्णय घेतला, त्यावेळी अनेक जण वल्गना करत होते. आमचे उमेदवार पडतील, अशा प्रकारे सांगितले जात होतं. मात्र, आज आम्हाला आमची मते मिळाली, पण महाविकास आघाडीची मतेदेखील आम्हाला मिळाली आहेत

**-देवेंद्र फडणवीस**

महायुतीचे सर्वच्या सर्व उमेदवार निवडून येतील असा विश्वास होता. आमच्याकडे ४२ मते होती. परंतु अनेक आमदारांनी आमच्या उमेदवारांनी मते दिली. त्यांनी टाकलेल्या विश्वासाला आमचे उमेदवार योग्य तो न्याय देतील. कोणत्याही पक्षातील आमदारांना खेचण्याचा प्रयत्न करायचा नाही असे ठरले होते. यापुढेही अशाच पद्धतीची एकी ठेऊन आम्ही महाराष्ट्रात महायुतीचं सरकार आणण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. ही निवडणूक बिनविरोध होईल, अशी अपेक्षा होती. परंतु एक उमेदवार अधिकचा आल्याने ही निवडणूक अधिक रंजक झाली आहे.

**-अजित पवार**

जयंत पाटलांनी महाविकास आघाडीवर विश्वास टाकायला नको होता. जनतेची सेवा करण्याचं आमचं मिशन हे पुढेही कायम राहणार आहे. खरं तर ही निवडणूक बिनविरोध होऊ शकणार होती. परंतु विरोधकांच्या अहंकारामुळे त्यांना अजून एक उमेदवार निवडून येणार. विरोधकांना ते चाणक्य असल्याचे वाटत होते.

**-सुधीर मुनगंटीवार**

## फडणवीसांना तुरुंगात पाठवायचा चौथा नंबर होता

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विधानसभेत मविआवर हल्लाबोल

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना मविआमधील नेत्यांनी भाजपा नेत्यांना तुरुंगात टाकण्याची योजना आखली होती, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अनेकदा केला आहे. दरम्यान, शिंदे यांनी आज (१२ जुलै) यावर सविस्तर भाष्य केलं. एकनाथ शिंदे विरोधकांना उद्देशून म्हणाले, 'तुम्ही भाजपावर, एनडीए सरकारवर आरोप करताय, त्यांनी सुडाचं राजकारण केल्याचा आरोप करताय, मात्र सुडाचं राजकारण भाजपाने नव्हे तर महाविकास आघाडीतल्या लोकांनी त्यांचं सरकार असताना केलं होतं. त्यांचं अडीच वर्षांचं सरकार होतं, आम्ही त्या सरकारमध्ये होतो. आम्ही ते राजकारण जवळून पाहिलं आहे. आम्ही त्या लोकांना रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याने काही फरक पडला नाही.'

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज अखेरचा दिवस होता. तसेच शिंदे-फडणवीस-पवार सरकारच्या कार्यकाळातलं हे शेवटचं अधिवेशन आहे. या अधिवेशनाच्या समारोपाच्या भाषणात एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले, 'महाविकास आघाडीचं सरकार असताना त्यांनी राज्यात सुडाचं राजकारण केलं होतं. भाजपा नेते नारायण राणे मुख्यमंत्र्यांविरोधात बोलले म्हणून त्यांना जेवणाच्या ताटावरून उठवून अटक केली. हनुमान चालीसा वाचणाऱ्या खासदार नवनीत राणा व त्यांचे पती आमदार रवी राणा यांना अटक केली. देशद्रोहाचे कलम लावून त्या दोघांना १२ दिवस तुरुंगात डांबलं. अभिनेत्री कंगणा रणौतचं घर तोडलं. तिच्याविरोधातील खटला लढण्यासाठी वकिलांना ८० लाख रुपये त्यांचं शुल्क म्हणून दिले. नौदलाच्या अधिकाऱ्याला मारलं. हे सगळं महाविकास आघाडीच्या (पान ४ वर)

## महायुती सरकारने राज्याची तिजोरीच साफ केली

### लोकसभा निवडणूकीत जिरवली म्हणून बहिणीची आठवण झाली; विजय वडेट्टीवारांची विधानसभेत टोलेबाजी

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- विधानसभा निवडणुका अवघ्या तीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या असताना राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात राजकीय कलगीतुरा पाहायला मिळण्याची शक्यता राजकीय जाणकारांनी वर्तवली होती. अपेक्षेप्रमाणे यंदाच्या अधिवेशनात सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या आमदारांमध्ये आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण झाल्याचं पाहायला मिळालं. त्यात अजित पवारांनी मांडलेल्या अर्थसंकल्पानंतर विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्तानेही राजकीय वातावरण तापल्याचं दिसून आलं. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी



केलेल्या भाषणातून त्यांनी सत्ताधाऱ्यांना टोले लगावल्याचं दिसून आलं. विजय वडेट्टीवार यांनी भाषणामध्ये लोकसभा निवडणूक निकालांचा उल्लेख केला. तसेच, सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या घोषणा म्हणजे ऋण काढून सण साजरा करण्यासारखा प्रकार असल्याची टीका त्यांनी केली.

'महायुती सरकारनं राज्याची तिजोरीच साफ केली आहे. तिजोरीत पूर्णपणे खडखडाट करून ठेवलाय. कर्ज काढून घर बांधणं मी समजू शकतो. पण माणसाला उपाशी ठेवून घर सजवणं हा नवा प्रकार या सरकारनं सुरू केला आहे. लोकसभा निवडणुकीत यांची चांगली जिरवली ना, म्हणून हे वठणीवर आलेत. दोन-चार योजना आणल्या तेही कर्ज काढून. फार बोलत होते, ४४-४५ येणार. घ्या अंबाडीचा भुरका. म्हणे ४४ आणि ४५. जिरवले ना. फार सांगत होते इतके येतील, तितके येतील. आलेत आणि मग बहिणीची आठवण झाली. तेही जाताजाता', अशा शब्दांत विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केलं. (पान ४ वर)

## आता २५ जून 'संविधान हत्या दिवस' पाळणार

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा सत्तेवर निवडून आल्यानंतर त्यांनी आणीबाणीप्रकरणी संसदेत मोठा गदारोळ केला. आणीबाणीवरून काँग्रेसला घेरलं. आणीबाणी म्हणजे संविधानाची हत्या असल्याचंही त्यांनी म्हटलं होतं. आता त्याही पुढे जाऊन केंद्र सरकारने दरवर्षी २५ जूनला संविधान हत्या दिवस पाळणार असल्याचं घोषित करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यासंदर्भातील एक्स पोस्ट करून माहिती दिली आहे.

अमित शाह यांनी त्यांच्या एक्स पोस्टवर म्हटलं आहे की, '२५ जून १९७५ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हुकूमशाही मानसिकतेचे लाजिरवाणे प्रदर्शन करून देशावर आणीबाणी लादून आपल्या लोकशाहीच्या आत्म्याचा गळा घोटला. कोणताही दोष नसताना लाखो लोकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि माध्यमांचा आवाज बंद करण्यात आला. भारत सरकारने दरवर्षी २५ जून हा दिवस 'संविधान हत्या दिवस' म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला आहे. हा दिवस १९७५ च्या आणीबाणीच्या अमानुष वेदना सहन करणाऱ्या सर्वांच्या मोठ्या योगदानाचे स्मरण करेल.'

## पुष्प कमल दहल नेपाळच्या पंतप्रधानपदावरून पायउतार

काठमांडू दि.१२ (वृत्तसंस्था)- नेपाळमध्ये पंतप्रधान पुष्पकमल दहल उर्फ प्रचंड यांनी शुक्रवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. काठमांडू पोस्टनुसार ते संसदेत विश्वासदर्शक ठराव जिंकण्यात अपयशी ठरले. फ्लोअर टेस्टमध्ये त्यांना २७५ पैकी केवळ ६३ खासदारांचा पाठिंबा मिळाला. नेपाळच्या नॅशनल असेंब्लीच्या १३८ खासदारांनी त्याच्या विरोधात मतदान केले.

खरं तर, या महिन्याच्या सुरुवातीला, नेपाळचा दुसरा सर्वात मोठा आणि केपी शर्मा ओली यांचा चीन समर्थक पक्ष सीपीएन-यूएमएलने पंतप्रधान प्रचंड यांच्या पक्ष कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळशी युती तोडण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर त्यांना नेपाळच्या राज्यघटनेच्या कलम १०० (२) अंतर्गत बहुमत सिद्ध करावे लागले. त्यात ते आज अपयशी ठरले. ओली यांच्या पक्ष सीपीएन-यूएमएलने देशातील सर्वात मोठा पक्ष नेपाळी काँग्रेससोबत युती करण्याचा निर्णय घेतला आहे. अवघ्या चार महिन्यांपूर्वी केपी शर्मा ओली यांनी प्रचंड यांच्या सरकारला पाठिंबा दिला होता. मग प्रचंड यांनी शेर बहादूर देउबा यांच्या नेपाळी काँग्रेससोबतची युती तोडली.

## सरकारने दिलेले १० टक्के आरक्षण टिकणारे नाही-जरांगे

जालना दि.१२ (प्रतिनिधी)- सरकारने दिलेलं आताचं १० टक्के आरक्षण चांगलं आहे. मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या १० टक्के मागास सिद्ध केलं आहे. परंतु, मिळालेलं आरक्षण ५० टक्क्यांच्या आत नसल्याने ते टिकत नाही. म्हणून त्याला विरोध आहे. दिलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी होण्यापूर्वीच कोर्टात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे आम्ही ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण मागत आहोत. शासनाला एक महिन्याची मुदत दिली असून, सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी आमच्या व्याख्येनुसार करा, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली.



मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत जालना शहरात शुक्रवारी मराठा आरक्षण शांतता रॅली काढण्यात आली. या रॅलीच्या समारोपप्रसंगी जरांगे पाटील यांनी उपस्थित समाज बांधवांना संबोधित केले. २००१ आणि २०१२ च्या कायद्यात सुधारणा करून मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करावा. सगेसोयऱ्यांची अंमल बजावणी केवळ मराठ्यांसाठी नाही. त्या कायद्यात दुरूस्ती केली तर केवळ मराठा समाजच नव्हे तर सर्व जातीधर्मासाठी सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी होणार आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न भाजप आणि काँग्रेसमुळे ७० वर्षापासून रखडला आहे. १६ टक्के आरक्षण राणे समितीने दिले ते उडाले. १३ टक्के आरक्षण दिले ते उडविले (पान ४ वर)

## मनोज जरांगेंना २८८ उमेदवार पाडण्यासाठी शुभेच्छा; लक्ष्मण हाकेंचा टोला

सोलापूर दि.१२ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्रीसाहेब तुम्ही राज्यातील १२ कोटी समाजाचे नेतृत्व करीत असून आम्ही ६० टक्के ओबीसीने तुम्हाला मते दिली आहेत. तुम्ही सगेसोयरेंचा अध्यादेश काढू नका, अन्यथा आम्ही राज्यातील सर्व ओबीसी मुंबईत येऊन मुंबई जाम करू असा इशारा प्रा. लक्ष्मण हाके यांनी दिला. एकाबाजूला उद्या मनोज जरांगे यांना दिलेल्या शब्दानुसार सगेसोयरेंबाबत मुख्यमंत्र्यांना हा अध्यादेश काढण्याबाबत निर्णय घ्यावा लागणार असताना आता ओबीसी समाजाने दिलेल्या हा इशाऱ्यामुळे सरकार पुढील अडचणी वाढणार आहेत.

मनोज जरांगे हे रोज आपल्या मागण्या बदलत असतात यावरून बोलताना आज लक्ष्मण हाके यांनी थेट मनोज जरंगे याना ऑफर दिली. जरांगे तुम्हाला २८८ आमदार पाडायचे आहेत, तर सुरुवात मुख्यमंत्र्यांपासून करून शेवट सांगोलामधील शहाजीबापू यांच्यापर्यंत करा. आमच्या तुम्हाला शुभेच्छा आहेत असे सांगितले. हे सर्व पडायलाच पाहिजे, नव्या दमाचे चळवळीतील सर्वसामान्य तरुणांना विधानसभेत (पान ४ वर)

## उद्धव ठाकरे वाघासारखे लढले, विधानसभेला त्यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात येणारच-ममता बॅनर्जी

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- उद्धव ठाकरे यांचा पक्ष आणि चिन्ह हिसकावला गेला, ते अनैतिक होते. तरीही उद्धव ठाकरे वाघासारखे लढले ही गोष्ट मला आवडली. मी आता विधानसभा निवडणुकीत त्यांच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात येईन, असे वक्तव्य तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केले. ममता बॅनर्जी शुक्रवारी मुंबईत आल्या होत्या. यावेळी त्यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यानंतर त्या सिल्व्हर ओकवर जाऊन शरद पवार यांचीही भेट घेणार असल्याची त्यांनी पुष्टी केली. तत्पूर्वी मातोश्रीवर झालेल्या पत्रकार परिषदेत ममता बॅनर्जी यांनी सद्य राजकीय परिस्थितीवर भाष्य केले.

मी नेहमी मुंबईत येते तेव्हा शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना भेटते. आता मुकेश अंबानी यांनी मला निमंत्रित केलेय, म्हणून मी मुंबईत आले आहे, असे ममता बॅनर्जी यांनी सांगितले. केंद्रातील मोदी सरकार स्थिर नाही, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले. मात्र, हे सरकार अस्थिर करण्यासाठी तुम्ही चंद्राबाबू नायडू किंवा नितीश कुमार यांच्या संपर्कात आहात का, असा प्रश्न ममता यांना विचारण्यात आला. त्यावर ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारच्या विरोधात जाऊन मी काहीच करणार नाही, असे सांगितले. मी कोणाच्याही संपर्कात नाही, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले.

## नवाब मलिक यांच्या वैद्यकीय जामिनात दोन आठवड्यांची वाढ

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- माजी मंत्री नवाब मलिक यांना वैद्यकीय ग्राउंडवर जामीन आणखी दोन आठवड्यांनी वाढवण्यात आला आहे. नवाब मलिक यांच्या जामिनाचा आज शेवटचा दिवस होता. त्यानुसार आज सर्वोच्च न्यायालयाकडून त्यांच्या जामीनामध्ये दोन आठवड्यांसाठी वाढ करण्यात आली आहे. ईडीकडून ईडीच्या वाकिलांना न्यायालयामध्ये कोणती भूमिका घ्यायची याबाबत कोणतीही सूचना नसल्याने जामीन वाढवत असल्याचे न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटलं आहे. त्यामुळे अंतरिम जामीन त्याचा दोन आठवड्यांसाठी वाढवण्यात आला.

नवाब मलिक मनी लॉंड्रिंग प्रकरणात वैद्यकीय कारणास्तव अंतरिम जामिनावर तुरुंगाबाहेर आहेत. नवाब मलिक यांना २०२२ मध्ये मनी लॉंड्रिंग प्रकरणात अटक करण्यात आली होती. नवाब मलिकवर अंडरवर्ल्ड दाऊद इब्राहिम आणि त्याच्या साथीदारांसोबत पैशांच्या व्यवहाराचा आरोप होता.

## हाथरस चेंगराचेंगरीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिका फेटाळली

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणी दाखल झालेली जनहित याचिका सर्वोच्च न्यायालायने आज (१२ जुलै) फेटाळून लावली. प्रत्येक प्रकरण कलम ३२ अंतर्गत दाखल केले जाण्याची गरज नाही. उच्च न्यायालयेही सक्षम न्यायालये असून तेही अशा प्रकारच्या प्रकरणांना सामोरे जाऊ शकतात, असं सर्वोच्च न्यायालायने नमूद केलं. लाईव्ह लॉ संकेतस्थळाने याबाबत वृत्त दिलं आहे.

"सर्व जनहित याचिका कलम ३२ अंतर्गत घेण्याची गरज नाही; तुम्ही उच्च न्यायालयात याचिका दाखल करा. या सगळ्याचा विचार म्हणजे घडणाऱ्या घटनांबद्दल एक प्रकारची मोठी चर्चा करणे आहे. अर्थातच या घटना अतिशय अस्वस्थ करणाऱ्या घटना आहेत. उच्च न्यायालये ही सक्षम न्यायालये आहेत, ती अशा प्रकारच्या प्रकरणांना सामोरे जाण्यासाठी असतात, असे भारताचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी याचिकाकर्ते अधिवक्ता विशाल तिवारी यांना सांगितले. त्यानुसार, सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जेबी पारदीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्याला हाथरस (पान ४ वर)

# पाऊस ऋतू खवय्यांचा

चिंब भिजलेल्या पावसात पोटासाठी काहीतरी झणझणीत मिळावं म्हणून खवय्ये मंडळी बाहेर पडताना दिसतात. गरम गरम कडक चहा, कुरकुरीत भजी, खरपूस भाजलेला मका, तिखट झणझणीत सूप हे पावसाचा आनंद द्विगुणित करतात. परंतु यंदाच्या वर्षी कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे हे सर्व दिव्य स्वप्नच ठरले आहे.

पाऊस म्हणजे आठवणींची साठवण.. पाऊस म्हणजे मस्तीची उधळण.. पाऊस म्हणजे मातीचा मृगंध.. आणि पाऊस म्हणजे खवय्यांचा सण..पावसाने यंदा वेळेवर एन्ट्री केली. कोणी मैदानावर गेलं तर कोणी घराच्या गच्चीवर तर कोणी खिडकीच्या बाहेर बरसणाऱ्या पावसाचा आनंद लुटला.

पाऊस हा प्रत्येक ठिकाणी सारखाच पडतो, फक्त पावसात भिजण्याची प्रत्येकाची कारणे वेगवेगळी असतात. तरुणाई चौपाटीवर जाऊन आपल्या प्रेमासोबत पावसाचा आनंद लुटतो तर कॉलेजिअन्स मैदाने किंवा ओस पडलेले रस्ते यांचा वापर करून फुटबॉल, क्रिकेट खेळत पावसात भिजतात, काहींना पाऊस म्हणजे नुसताच चिखल आणि घाण वाटतो तर काहींसाठी पाऊस हा एकांतात नेणारा क्षण असतो. पावसाळ्यातली ट्रेकींग असो वा बाईक रायडिंग किंवा चिखलात फुटबॉल खेळणं असो वा पावसात फिरणं या साऱ्यासोबत जर काही गरमा-गरमा मसालेदार खायला मिळाले तर व्वा 'लाईफ में और क्या चाहिए?'

'पावसाची सर आता नुकतीच बरसून गेली आणि आठवणींची पाऊलवाट पुन्हा एकदा दरवळली' असं म्हणत खिडकीच्या दारापाशी चहाचा घुटका घेत जुन्या काळात हरवणं किती छान असतं ना! पाऊस, खिडकीतून येणारा वारा, टिप टिप पडणाऱ्या पावसाच्या सरी आणि त्यासोबतच गरमा-गरम कडक चहा म्हणजे दुग्धशर्करा योगच. कडक चहाचा आस्वाद घ्यायचा म्हणजे नक्की काय करायचं? आपण चहामध्ये नेहमीच आलं टाकतो. पण त्यासोबतच वेलचीची जी उरलेली वरची आवरणं असतात ती जर चहा पावडरच्या डब्यात ठेवली आणि नंतर चहामध्ये टाकली तर चहाला एक वेगळाच स्वाद येतो. काही हॉटेल्समध्ये चहामध्ये काळीमिरी सुद्धा टाकतात. चहाला कडकपणा यावा व चहा पिऊन आलेली मरगळ जावी आणि उत्साह संचारावा म्हणून त्यात गवती चहा टाकतात. मृदाच्या सुंगधात घेतलेला चहाचा घुटका म्हणजे आठवणींच्या अल्बममध्ये साठवलेल्या गोष्टी. वाफळलेला चहा आणि पाऊस म्हणजे दिनक्रमात व्यस्त असणाऱ्या लोकांचा आवडीचा क्षण. पावसाळ्यात बाईक रायडिंगला काही औरच मजा असते. बाईकची क्रेझ असणाऱ्यांना चहाची तल्लफ नाही आली तर ते बाईक रायडर्स कसले. अशावेळेस एखाद्या मोठय़ा हायवेवर टपरी शोधली जाते आणि कोसळणाऱ्या नभाकडे पाहत बाईकला किक मारून पुन्हा पुढच्या प्रवासाला सुरुवात होते.

पावसाळ्यात फुटबॉल खेळणं कोणाला आवडत नाही? मे महिन्यातही जेवढी गर्दी मैदानात नसते त्यापेक्षा जास्त गर्दी फुटबॉल खेळाडूंची पावसात असते. अगदी वर्षभर अडगळीच्या खोलीत ठेवलेला फुटबॉल पहिल्याच पावसात बाहेर येतो आणि सुरू होतो फुटबॉल. अशा वेळेस वडापाव, भजीपावच्या गाडय़ांवर घमघमाट सुटलेला असतो. या मुसळधार पावसात मग आपसूकच निघून जातं 'भाई कांदा भजी प्लेट लाना.' काही जण कांद्याला बघून नाक मुरडतात पण पावसाळ्यात मात्र प्रत्येक जण कांदा भजीच्या प्रेमात पडतो. या भजीसोबत आरास केली जाते ती हिरव्या चटणीची. सध्या कांदा पकोडा भजीला जास्त मागणी दिसून येते, शिवाय कांदा भजीसोबत जर भाजलेली मिरची मिळाली तर क्या बात! रस्त्याच्या कडेला असणाऱ्या भजीपावाच्या गाडय़ांमधून सुटणारा घमघमाट पाहून बाईक स्वारांनाही बाईक थांबवून खाण्याची इच्छा नाही झाली तर पावसाची मजाच ती काय? पण हे आता घरात राहूनच शक्य झाले आहे. बाहेर जावून मजा घेण्याची सोय राहिलेली नाही. रिमझिमणाऱ्या पावसात.. झोंबणाऱ्या वाऱ्यासोबत खरपूस भाजलेल्या कोवळ्या मक्यावर लिंबू, तिखट मसाला पेरून आणि हिरव्यागार पानात अलगद धरत मका खातानाची मजा काही औरच. पावसाच्या आगमनासोबत ठिकठिकाणी रस्त्याच्या कडेला मकाविक्रेत्यांच्या गाडय़ा लागलेल्या असतात. प्लास्टिकच्या छोटय़ा पंख्याने, वहीच्या पुठ्ठय़ाने शेगडीला जोरजोरात वारा घातला जातो. त्यामुळे निखारा अधिकच लालबुंद होतो. या निखाऱ्यांवर मका भाजला जातो. सर्व बाजूंनी दाणे खरपूस भाजले गेले की त्यावर मसाला भुरभुरून मग पोपटी हिरव्या पानावर अलगद ठेवून गिऱ्हाइकाला दिला जातो. मक्याची खरी मजा चौपाटीवर. येणाऱ्या लाटा अंगावर झेलत आंबट-तिखट कणीस खाणे खूप आनंददायक असतं.

चहा, भजी, वडापाव, सूप, गरम मका या सा-या गोष्टी पावसातला आनंद द्विगुणित करणाऱ्या आहेत. चिंब भिजलेल्या पावसात पोटासाठी काहीतरी झणझणीत मिळावं म्हणून खवय्ये मंडळी अनेक स्टॉल्स शोधतात. कधी कधी या पदार्थांची मेजवानी घरीच केली जाते तर कधी पावसात भिजण्यासाठी हॉटेलचा रस्ता धरला जातो. परंतु स्टॉलवरचं खाणं आरोग्यास हानिकारक आहे. परंतु खाण्याचा मोह कोणाला आवरता येतो का? तरी देखील आपण कुठे खातोय? त्या होटेलचा किंवा स्टॉलचा दर्जा काय आहे? तिथे कितपर्यंत स्वच्छता राखली जाते हे पाहणंही गरजेचं असतं. पावसाचा आनंद घेण्याच्या नादात आरोग्याकडेही लक्ष देणं तितकंच गरजेचं असतं.

# सावरकारांच्या त्रिखंडात गाजलेल्या उडीला ११४ वर्ष पुर्ण झाले

**८ जुलै १९१० या दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मार्सेलिस बंदरात 'मोरया' नावाच्या बोटे वरून उडी मारली, त्यांचा हा पराक्रम त्रिखंडात गाजला.जगात प्रथमच भारतीय स्वातंत्र्याची चर्चा सुरू झाली. युरोपियन वृत्तपत्रांनी सावरकरांची तुलना मेजिनी, गॅरिबाल्डी,कोसुथ यांच्याशी केली.' कृतीतून प्रचार' करण्याचे महत्कार्य या उडी ने करून दाखवलेच पण भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जागतिक व्यासपीठावर मांडण्यात सावरकर यशस्वी झाले. इंग्रजांच्या खोट्या प्रचाराचा बुरखा फाडला. ही फक्त उडी नव्हती इंग्रजी साम्राज्यावर मारलेली झेप होती. आज आठ जुलै सावरकरांच्या या त्रिखंडात गाजलेल्या उडीला एकशे दहा वर्षे पूर्ण होत आहेत त्यानिमित्त....**

**भारतामध्ये** सुरू असलेल्या क्रांतिकारी कारवाया पाठीमागे सावरकरच आहेत, सावरकरांच्या सूचनेवरून मदनलाल धिंग्रा, अनंत कान्हेरे यांनी इंग्रज अधिकाऱ्यांचा वध केला. इंग्रज सरकारविरुद्ध भारतीय क्रांतीकारकांची फळी उभा करणारे सावरकरच आहेत, हे लक्षात आल्यानंतर इंग्रजांनी सावरकरांना कायदेशीर रित्या अटक करून त्यांच्याविरुद्ध खटला भरला. इंग्लंड वरून भारताकडे पुढील कारवाईसाठी चा प्रवास सुरू झाला.

१ जुलै, १९१० यादिवशी सावरकर हिंदुस्थानात परत येण्यासाठी 'मोरिया' बोटीत बसले. त्यांच्यावर रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून दोन इंग्रज पहारेकरी लक्ष ठेवून होते. पॉवर आणि पारकर या दोन इंग्रज अधिकाऱ्यांची खास सावरकरांवर लक्ष ठेवण्यासाठी नेमणूक करण्यात आली होती. सावरकरांच्या डोक्यात इथुन कसे निसटता येइल हाच विचार चालूहोता. मोरिया बोट मार्सेलिस बंदरात यांत्रिक बिघाडामुळे काही काळ थांबली होती. सावरकरांनी बोटीचे निरीक्षण करून 'पोर्ट होल' मधून पसार होण्याचा निश्चय केला होता. अनायासे बोट इथे थांबली आहे, जर आपण इथुन पोहत जावून फ्रान्सचा किनारा गाठला तर आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार इंग्रज अधिकारी आपल्याला पकडु शकणार नाहीत. या सगळ्या गोष्टींचा त्यांनी व्यवस्थित अभ्यास केलेला होता. ८ जुलै, १९१० रोजी शौचकूपात जावून तिथल्या काचेच्यादरवाज्यावर स्वतःचा अंगरखा ठेवला त्यामुळे बाहेर उभ्या पहारेकऱ्यांना आतल्या हालचाली दिसणार नाहीत. खरचटण्याची, रखड्यांची व चामडी सोलवटण्याची पर्वा न करता त्या अथांग सागरात सावरकरांनी उडी मारली. पोहत पोहतते फ़्रान्सच्या किनाऱ्यावर पोचले देखिल पण इंग्रज शिपायांच्या लालचीला बळी पडून फ्रान्सच्या पोलिसांनी त्यांना इंग्रजांच्या स्वाधीन केले. सावरकर जर पकडले गेले नसते तर कदाचित भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न लवकर मार्गी लागला असता सावरकरांच्या पुन्हा अटकेने भारतातील क्रांतिकारी चळवळीला मोठा गतिरोध निर्माण झाला.

वरील घटनेचा अभ्यास केला असता काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. एक म्हणजे समुद्रात उडी घेवून किनाऱ्यापर्यंत पोहत पोहत पोचायचे हा निर्णय घेणे हे दुबळ्याचे काम नाही, यासाठी प्रचंड शारीरिक शक्ति आणि मनाचा निर्धार लागला असणार. दुसरी गोष्ट कायद्याचा व्यवस्थित अभ्यास आणि त्याचा अचुक वापर करण्याची बुद्धि. त्यांच्या याच



गोष्टी मला खूप आवडून जातात.

सावरकराची ही उडी पाहून लोककवी मनमोहन म्हणतात,

**ही उडी बघतांना मृत्यू**
**कर्तव्य विसरला ।**
**बुरुजावर झेपावलेला**
**झाशीतील घोडा हसला ॥**

वासुदेव बळवंतांच्या कंठात
हर्ष गदगदला ।
क्रांतीच्या केतूवरला अस्मान
कडाडून गेला ॥
विश्वात केवळ आहेत
विख्यात बहाद्दूर दोन ।
जे गेले आईकरिता सागरास
पालांडून ।
हनुमानानंतर आहे त्या
विनायकाचा मान ॥

**– लोककवी मनमोहन**

भारतात आल्यावर मुंबईत विशेष न्यायालय निर्माण करून सावरकरांवर इंग्रज सरकारने खटला चालवला. तसेच नाशिक कटाच्या दुसऱ्या खटल्याचे कामकाजही सुरू होतेच. दोन्ही खटल्यांचा निकाल लागला आणि सावरकरांना दोन जन्मठेपेची म्हणजे ५० वर्षे काळयापाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. हे ऐकून सुद्धा या वीराच्या प्रसन्नतेत काहीच फरक पडला नाही. उलट एक इंग्रज अधिकारी जेव्हा त्यांच्याशी कुत्सितपणे त्यांच्या या ५० वर्षे शिक्षेबद्दल बोलला तेव्हा सावरकरांनीच त्याला प्रतिप्रश्न विचारला, 'ब्रिटिश सरकार तरी इथे अजुन ५० वर्षे टिकणार आहे का?'

सावरकरांची ही भविष्यवाणी खरोखरच खरी ठरली. आणि भारताला १५ ऑगस्ट१९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. आज या त्रिखंडात गाजलेल्या वडीला एकशे दहा वर्ष पूर्ण होत आहेत सावरकरांसारख्या प्रखर राष्ट्रभक्त क्रांतिकारकांनी केलेले योगदान हे भारतातल्या तरुण पिढीला मार्गदर्शकच नाही तर त्यांच्यामध्ये हे राष्ट्रभक्तीची ज्योत तेवत ठेवण्यासाठी महत्वाचे आहे.

**रोमांचकारी उडीचे परिणाम...**

**मातृभूमीसाठी प्राण गेले तरी चालेल हा संदेश या उडीने दिला.**

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न 'कृतीतून' जगाच्या व्यासपीठावर मांडण्याचे काम या उडीने केले.

बॅरिस्टर सावरकरांचा कायद्याचा अभ्यास किती दांडगा होता याचा परिचय या उडी ने दिला. फ्रान्समध्ये इंग्रजांचा कायदा चालत नाही त्यामुळे तेथे उडी मारली आणि आपण सुटलो तर पुन्हा इंग्रज पकडू शकत नाहीत हे सावरकरांना माहित होते.

उदात्त अपयश हे देखील परिपूर्ण यशा इतकेच जगाला कल्याणकारक ठरू शकते, हे या रोमांचकारी उडीने सिद्ध केले. उडी नंतर सावरकरांवरील खटला हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात चालला गेला यामुळे जगाचे लक्ष या खटल्याकडे वेधले गेले.

११ जुलै १९१० रोजी डेली मेल या या फ्रान्सच्या वर्तमानपत्राने सावरकरांच्या धाडसी उड्डाणाची बातमी जगभर प्रसिद्ध केली नंतर रायटर या संस्थेने हीच बातमी जगभर प्रसिद्ध केली होती.

या उडीमध्ये नुसती प्रचंड कल्पकता नव्हती तर फार मोठा धोकाही होता आणि त्याला तोंड देण्याचे मोठे शौर्य सावरकरांसारख्या क्रांतीकारकाने दाखवून दिले.

सावरकरांनी ज्या 'मोरया' बोटीच्या पोर्टहोल मधून निसटण्याची ठरवले तो लहान होता, सवरकरांच्या छातीचा घेर ३२ इंच होता,त्यांची उंची पाच फूट दोन इंच होती आणि गळ्याचा घेर १३ इंच होता, इतक्या सहजपणे या पोर्टल मधून आडवे बाहेर पडणे सोपे नव्हते परंतु शारीरिक व्यायाम सावरकर करीत असल्यामुळे अंगाचा संकोच करण्याची कला ते शिकले होते तिचा उपयोग करून ते पोर्टल मधून बाहेर पडले, असे करत असताना छातीची पोटाची कातडी सोलुन निघाली ते रक्तबंबाळ झाले परंतु तोंडातून एकच घोषणा देत ते पुढे पोहोचत होते ती घोषणा होती 'स्वातंत्र्य लक्ष्मी की जय'...

**स्मरण अतुलनिय साहसाचे**

**– डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर बीड.**

# अखंड सावध राहावे

**आपल्या** देशाला इस्लामिक राष्ट्रात रूपांतरित करण्यासाठी जोरदार प्रयत्न चालू आहे. त्यासाठी कपोलकल्पित घटनांची निर्मिती करून त्याचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर सातत्याने केला जात आहे. असा प्रयत्न करण्यामागचे कारण म्हणजे हिंदू समाजात वैचारिक गोंधळ निर्माण करुन संभ्रम निर्माण करण्याचा विरोधकांचा मोठा डाव आहे. आजही हिंदू समाजातील बहुसंख्य जनतेला सावरकरांना अभिप्रेत असलेली राजकीय दृष्टी प्राप्त झाली आहे असे म्हणता येत नाही. विरोधकांवर विश्वास ठेवण्याकडे आजही कल आपल्या हिंदू समाजातील बहुसंख्य जनतेचा आहे. विरोधी पक्ष हा सातत्याने हिंदुत्ववादी राजकीय पक्षांना आणि संघटनांना हिंदू विरोधी ठरवण्यासाठी धडपडत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातही सातत्याने विविध प्रकारचे आरोप प्रत्यारोप केले जात आहेत. विरोधकांच्या बनावट आणि काल्पनिक कथांना बळी पडणे म्हणजे हिंदूंनी स्वतःच स्वतःचा घात करण्यासारखे आहे. म्हणून हिंदू समाजाने अखंड सावध राहिले पाहिजे.

ईव्हीएम मशीन बाबत सातत्याने संशय व्यक्त केला जात आहे. एवढेच नाही तर नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत निवडणूक आयोगाला लक्ष्य करून खोटे नाटे आरोप करण्यात आले. तसेच निवडणूक आयोगाला न्यायालयात सुद्धा खेचण्याचा प्रयत्न करण्यात आला. हिंदू जनतेने एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की सर्व विरोधी पक्ष अत्यंत लबाड आहेत. त्यांना कोणत्याही परिस्थितीत हिंदुत्वनिष्ठ, राष्ट्रनिष्ठ पक्षाच्या हाती देशाची सत्ता जाऊ द्यायची नाही. त्यामुळे ते विविध प्रकारे विद्यमान सरकारला बदनाम करण्याचा घाट घालत आहेत. त्यांच्या या षडयंत्राला आपण बळी पडून त्यांचे मनसुबे यशस्वी करण्याचे पातक आपल्याकडून घडू नये म्हणून हिंदू समाजाने अखंड सावध असले पाहिजे.

नुकताच महाराष्ट्र शासनाने वक्फ बोर्डाला दहा कोटी रुपये दिल्याची बातमी सर्वत्र पसरली. पण त्यासाठी एक बनावट कहाणी विरोधी पक्षाने करून सर्वत्र प्रसारित केली ती म्हणजे वक्फ बोर्डाला दहा कोटी महाराष्ट्र शासनाने देऊन हिंदू समाजाचा विश्वासघात केला आहे. यावर तात्काळ विश्वास ठेवून हिंदूंकडूनच तीव्र विरोध व्यक्त केला गेला. हिंदूंकडून झालेली ही चूक विरोधी पक्षांच्या पथ्यावर पडलेली आहे.

वक्फ बोर्डाची स्थापना काल किंवा आज झालेली नाही. या सर्वाची प्रक्रिया सात दशकांपूर्वी पासून सुरू आहे. वक्फ बोर्डाला अमर्यादित अधिकार देण्यात आले आहेत. एवढेच नव्हे तर वक्फ बोर्डाच्या सहाय्याने एक समांतर अशी न्याय व्यवस्था ही अस्तित्वात आणली आहे. या सर्व गोष्टी कॉंग्रेसकडून घडलेल्या आहेत. वक्फ बोर्डाला असा अमर्यादित अधिकार दिल्यानंतर देशाच्या राष्ट्रीय संपत्तीवर पहिला अधिकार मुसलमानांचा आहे असे विधान देशाचे पंतप्रधान माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी केल्याचे सर्वांना स्मरत असेल.

या अमर्यादित अधिकाराचा लाभ वक्फ बोर्डाने घेतला आहे. त्यामुळेच वक्फ बोर्ड लाखो एकर भूमी अवैधपणे स्वतःच्या नावावर करू शकले आहे. या बोर्डाच्या कह्यात असलेली भूमी पुनश्च प्राप्त करून घेणे नितांत आवश्यक आहे अन्यथा संपूर्ण देशाची भूमी या बोर्डाच्या ताब्यात जाईल आणि न्याय प्रस्थापित करता येणार नाही. अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील लाखो एकर जमीन भूमी जी या बोर्डाने अवैधपणे संपादन केली आहे त्याबाबतची सविस्तर माहिती प्राप्त व्हावी या हेतूने दहा कोटी रुपये उपयोगात आणले आहेत.

म्हणजे वक्फ बोर्डाच्या नावावर असलेली भूमी ही या बोर्डाकडे कशाप्रकारे हस्तांतरित झाली ? कोणाची भूमी या बोर्डाने स्वतःच्या नावावर करून घेतली? खरा सातबारा उतारा कोणाच्या नावावर आहे? तो वक्फ बोर्डाच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी त्यावर कोणी स्वाक्षरी केली? या आणि अशा अत्यंत महत्त्वाच्या मूलभूत प्रश्नांची संगतवार माहिती महाराष्ट्र शासनाकडे असेल तर त्याला अनुसरून निर्बंधांच्या चौकटीत राहून अवैध मार्गाने बळकावलेली जमीन पुनश्च सोडवणे महाराष्ट्र शासनाला सहज शक्य होईल. त्यासाठी या दहा कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पण ही सत्य माहिती बाहेर येऊ न देता विरोधी पक्षाकडून महाराष्ट्र शासनाने हिंदू समाजाचा विश्वासघात केला अशी आवई उठवण्यात आली.

हिंदू समाजात हिंदू समाजाच्या मनात महाराष्ट्र शासनाविषयीचे अविश्वासाचे बीज पेरण्यात आले. आता ते बीज रुजल्यानंतर त्याचा मोठा वृक्ष करण्यासाठी अशा प्रकारचे विविध आरोप विरोधी पक्षाकडून यापुढे सातत्याने केले जातील. म्हणजे येणाऱ्या निवडणुकीत बहुसंख्य हिंदू समाज हा विद्यमान महाराष्ट्र शासनाच्या पाठीशी उभा राहून त्याला मतदान करणार नाही. आणि असे घडले की सत्ता विरोधी पक्षांच्या हाती जाईल. विरोधी पक्षांच्या हाती सत्ता गेली की या देशात मनमानी राज्यकारभार करण्याची पूर्ण मोकळीक विरोधी पक्षाला मिळणार आहे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाच्या विषयी अविश्वास निर्माण करून स्वतःची पोळी भाजण्याचा प्रयत्न यशस्वीपणे विरोधी पक्षाने केला आहे. त्यांच्या या प्रयत्नाला हाणून पाडण्यासाठी हिंदू समाजाने अखंड सावध राहणे नितांत आवश्यक आहे.

वक्फ बोर्डाला देण्यात आलेले अमर्यादित अधिकार एवढे बलवान आहेत की या बोर्डाच्या विरोधात कोणालाही न्यायालयात जाण्यासाठी एकही दरवाजा उघडा ठेवण्यात आला नाही. वक्फ बोर्डाचे विसर्जन करून या बोर्डाने बळकावलेली संपूर्ण भूमी पुनश्च आपल्यात कह्यात घेणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट हिंदूंना साध्य करायचे आहे. ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य प्रकारे हालचाल करणे नितांत आवश्यक आहे. तसेच या हालचाली करताना कोणत्याही प्रकारे आपल्या हातून चूक होऊ नये म्हणून सर्व पुरावे आपल्या हाती यावेत यासाठी काही पैसा महाराष्ट्र शासनाला खर्च करावा लागत आहे. हे दहा कोटी रुपये खर्च केले की आपल्याला सर्व प्रकारचे पुरावे मिळतील त्याचा उपयोग आपल्याला अवैधपणे बळकावलेली जमीन या बोर्डाच्या कह्यातून सोडवून घेण्यासाठी सहाय्यभूत ठरणार आहे. म्हणून आपण विरोधकांच्या भूलथापांना बळी पडण्या ऐवजी अखंड सावध राहून विरोधकांचे कुटील डाव उधळले पाहिजेत. तरच आपण तरून जाऊ. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विरोधी पक्ष हा विश्वास ठेवण्याच्या पात्रतेचा आहे का याचाही विचार आपण केला पाहिजे? हिंदू समाजात फूट पाडून पक्षपात केला तो याच विरोधी पक्षांनी! भ्रष्टाचाराचे विविध विक्रम प्रस्थापित केले ते याच विरोधी पक्षांनी! अशा भ्रष्टाचारी आणि अराजक सदृश वातावरण निर्माण करणाऱ्या विरोधी पक्षावर विश्वास ठेवण्याचा अपराध आपल्याकडून घडून नये म्हणून आपण हिंदूंनी अत्यंत सावधगिरी बाळगणे नितांत आवश्यक आहे. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे आपणच आपल्या बांधवांवर अविश्वास किंवा संशय बाळगून आत्मघात करत आहोत. याची जाणीव सातत्याने आपल्याला असली पाहिजे. संशय सर्व गोष्टीचा विनाश घडवून आणतो. गीतेतल्या या वचनाकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही.

अत्यंत बिकट परिस्थिती आहे म्हणून हिंदू समाजाने संशय रहित होऊन राष्ट्रहिताचा विचार करून विरोधकांच्या कुटील डावाला बळी पडू नये एवढीच माफक अपेक्षा ठेवून हा लेख लिहिला आहे.

**–श्री दुर्गेश जयवंत परुळकर**

# आनंदलहरी भाग-८८

**निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥**

निंदा हा समाजाला लागलेला एक प्रकारचा रोग आहे. हा रोग समाजाच्या प्रगतीत अडसर ठरत असतो. वाद-विवादाला तोंड फोडण्याचे कामही निंदेकडून घडते. निंदा करणाऱ्याला क्षणिक आनंद मिळत असला तरी ज्याची निंदा केली जाते, त्याची मानसिकता ढवळून निघते. निंदेमुळे माणूस अस्थिर होतो. ही अस्थिरता यशाच्या वाटेवर अडथळा म्हणून उभी राहते. माणसाचे मानसिक खच्चीकरण निंदेमुळे होते. मानसिक खच्चीकरण झालेला माणूस आपल्या कर्तव्यात पाहिजे तेवढया वेगाने पुढे जाऊ शकत नाही. मानसिक खच्चीकरणामुळे माणसाचे शारीरिक व मानसिक नुकसान होते. हे नुकसान आर्थिक नुकसानीपेक्षा भयंकर असते. आर्थिक नुकसान कांही मार्ग शोधून भरुन तरी काढता येते, पण मानसिक नुकसान भरुन काढणे अवघड असते. आपली कोणी निंदा केली किंवा कोणी लहानसा मानसिक धक्का



जरी आपणाला दिला तरी आपण लगेच ढळतो, अस्थिर होतो. कोणी थोडासा मान-सन्मान केला किंवा साधारण महत्व दिले तर आपण आपली जागा सोडतो आणि लगेच आपल्या मनाने उच्चपद धारण करतो. आहे त्या परिस्थितीतून स्वत:ला दु:खाने किंवा अहंभावाने एकदम खाली आणणे किंवा एकदम वर चढविणे हितकारक नसते. ही एक प्रकारची अस्थिरता असते. निंदा, मान अवमान, महत्व हे सर्व मनाचे खेळ आहेत. मानले तर खूप कांही आहे आणि नाही मानले तर कांहीही नाही. मानण्याने अस्थिरत्व प्राप्त होऊन वाट्याला दु:खच येणार असेल तर न मानलेलेच बरे. तुकाराम महाराजांच्या जीवनात अनेकवेळा लोकानी विविध प्रकारे खुप चढ-उतार केले. काहींनी मान दिला तर काहींनी अवमान केला, तर कांहींनी टिंगल केली, निंदा केली तर कांहींनी पूजा केली. महाराजानी या सर्व परिस्थितीत समाधान मानले.सर्व परिस्थितीकडे त्यानी सकारात्मक दृष्टीकानातून पाहिले. त्यांची ही सकारात्मक दृष्टी त्यांच्या स्थिरत्वाला पुष्टी देणारी ठरली. चढ-उतारास कारणीभूत होणाऱ्या परिस्थितीचा त्यांनी मनावर कांहीच परिणाम होऊ दिला नाही. त्यांनी आपल्या आुभवातून याबद्दल बोलताना म्हटले आहे की, 'निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ॥ मज हें ही नाही तेंही नाही । वेगळा दोहींपासूनी ॥'

सुख-दु:ख, चांगले-वाईट, निंदा-स्तुती, मान-अवमान अशा दोन टोके असणाऱ्या सर्व परिस्थितीला समान समजणे ही साधी बाब नाही. अशा सर्व परिस्थितीकडे समत्वाने पाहण्याची दृष्टी ज्याला लाभली तो संत महात्माच म्हणून ओळखला जातो. आपण संत, महात्मेच बनावेत असे कांही नाही. पण चढ-उतारात्मक परिस्थितीकडे समत्वाने पाहण्याची दृष्टी निर्माण करुन चांगला माणूस बनू शकलो तरी पुरेसे होणार आहे. दुसऱ्याच्या तोंडावर हात ठेवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वत:च्या कानावर हात ठेवण्याचा प्रयन्त केला तरी निंदेसारख्या शस्त्राचे घाव आपल्या मनावर उमटणार नाहीत. शरीरावरचे घाव बुझविता येतात पण मनावरचे घाव बुझविणे अवघड असते. म्हणून असे घाव आपल्या मनावर पडणारच नाहीत, अशीच आपली मानसिकता आपण बनवून घ्यावी. संत श्री ज्ञानोबा-तुकारामांच्या जीवनाकडे पाहून आपण अशी मानसिकता बनवून घेण्याचा प्रयन्त करु या. जय जय राम कृष्ण हरी।

**– ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**

# बहुचर्चित आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्याकडे ११० एकर जमीन, 'हिरानंदानी'त ७ अलिशान फ्लॅट्स आणि १७ लाखांचे सोन्याचे घड्याळ!

पुणे, दि. १२ (वृत्तसंस्था) - नॉन क्रिमिलेयर आणि बहुविकलांगता या दोन प्रकारातून केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून आयएएस म्हणून निवड केल्या गेलेल्या आणि चमकोगिरी तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील अवाजवी मागण्यांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या परीविक्षाधीन अधिकारी पूजा खेडकर यांच्याबाबतीत धक्कादायक खुलासे होत आहेत. विशेष म्हणजे नॉन क्रिमिलेयरसाठी पालकांचे उत्पन्न आठ लाख रुपयांच्या खाली असणे अनिवार्य आहे. परंतु पूजा खेडकर व त्यांच्या आईवडिलांकडे कोट्यवधी रुपयांची संपत्ती असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे खासगी ऑडी कारवर लाल दिवा लावून चमकोगिरी करणाऱ्या पूजा खेडकर यांच्या नोकरीवरच गंडांतर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

परीविक्षीधीन आयएएस अधिकारी पूजा खेडकर या पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील गैरवर्तणूक आणि अवाजवी मागण्यांमुळे चर्चेत आलेल्या हेत. त्यांची वाशिम येथे बदली करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थी अधिकारी असताना एखाद्या व्यक्तीची बदली होण्याची घटना दुर्मिळ मानली जाते.

पूजा खेडकर यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोगातून (यूपीएससी) झाली आहे. नॉन क्रिमिलेयर आणि बहुविकलांगता या दोन प्रकारातून त्यांची निवड झाल्याचे सरकारच्या संकेतस्थळावरून दिसून येत आहे. नॉन क्रिमिलेयरसाठी पालकांचे उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी करणे अनिवार्य असते. परंतु आता पूजा खेडकर यांच्या संपत्तीचा तपशील समोर आला आहे.



नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्रावर आयएएस झालेल्या पूजा खेडकर यांच्या आईवडिलांकडे तब्बल ११० एकर शेतजमीन आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील जमीन कमाल शेतजमीन धारणा कायद्याचे उल्लंघन असल्याचे सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी म्हटले आहे.

पूजा खेडकर यांच्याकडे १.६ लाख चौरस फूट क्षेत्रफळाची ६ दुकाने, 'हिरानंदानी' मध्ये ७ अलिशान फ्लॅट्स आहेत. पूजा खेडकर यांच्याकडे ९०० ग्रॅम सोने-हिरे आणि १७ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे घड्याळही आहे. त्यांच्याकडे ४ कार, दोन प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांमध्ये भागीदारी तसेच एक ऑटोमोबाईल कंपनीही आहे. पूजा खेडकर यांच्याकडे तब्बल १७ कोटी रुपयांची संपत्ती आहे. तरीही त्या नॉन क्रिमिलेयर गटातून आयएएस कशा झाल्या, याची चौकशी व्हायला नको का?, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार यांनी उपस्थित केला आहे. पूजा खेडकर या २०२२ च्या महाराष्ट्र केडरच्या आयएएस अधिकारी आहेत. जून महिन्यात त्यांची पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिणार्थी अधिकारी म्हणून नियुक्ती झाली होती. पूजा खेडकर या अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील माजी सनदी अधिकारी दिलीप खेडकर यांच्या कन्या आहेत. दिलीप खेडकर यांनी राज्याच्या प्रदूषण विभागाचे आयुक्त म्हणूनही काम पाहिले आहे. पूजा खेडकर यांच्या आई मनोरमा खेडकर या भालगावच्या लोकनियुक्त सरपंच आहेत.

दिलीप खेडकर यांनी सेवानिवृत्त झाल्यानंतर अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या पाठिंब्यावर निवडणूक लढवली. निवडणूक लढवताना त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची मालमत्ता ४० कोटी रुपयांहून अधिक असल्याचे दाखवले आहे. तरीही पूजा खेडकर या नॉन क्रिमिलेयर गटातून आयएएस म्हणून निवड होण्यास पात्र कशा ठरल्या? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# परिवहन वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी ५० रुपये प्रतिदिवस विलंब शुल्क आकारण्यास स्थगिती

मुंबई, दि. १२ (वृत्तसंस्था) - परिवहन वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी येणाऱ्या १५ वर्षांच्या आतील सर्व परिवहन वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रतिदिवस ५० रुपये विलंब शुल्क आकारण्याच्या कार्यवाहीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. सर्व वाहनधारकांनी याची नोंद घेत आपापली वाहने योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणासाठी प्रादेशिक, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरणाचे विलंब शुल्क प्रतिदिन ५० रुपये आकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. विलंब शुल्क माफ करणे/ विलंब शुल्काच्या आकारणीमधून सूट देण्याबाबत ऑटोरिक्षा-टॅक्सी चालक संघटना तसेच विविध परिवहन संवर्गातील वाहन धारकांच्या संघटना यांच्याकडून शासनाकडे निवेदने प्राप्त झाली होती.

सरकारने वाहनधारक व विविध संघटना यांच्या निवेदनांचा व मागणीचा सहानुभूतीपुर्वक विचार करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिली व त्यास अनुसरुन विधानसभा सभागृहात निवेदनाद्वारे १५ वर्षांच्या आतील सर्व परिवहन वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रतिदिन ५० रुपये एवढे विलंब शुल्क आकारण्याच्या कार्यवाहीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार सरकारने ११ जुलै रोजीच्या निर्देशाद्वारे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी येणाऱ्या १५ वर्षांच्या आतील सर्व परिवहन वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणास विलंब झाल्यानंतर प्रतिदिन ५० रुपये इतके विलंब शुल्क आकारण्याच्या कार्यवाहीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. सर्व वाहन धारकांनी याची नोंद घ्यावी व आपली वाहने योग्यता प्रमाणपत्र नुतणीकरणासाठी प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये सादर करावीत, असेही परिवहन आयुक्त भिमनवार यांनी म्हटले आहे.

# धक्कादायक! विद्यापीठाच्या जलतरण तलावात अप्रशिक्षित भोंदू योगीबाबाच मुलींना द्यायचा पोहण्याचेही धडे, प्रशिक्षित कोच मात्र परागंदा !

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा विभागात अनधिकृतपणे योगवर्ग चालवून विद्यार्थिनींशी गैरवर्तन करणाऱ्या भोंदू योगीबाबाचे अनेक धक्कादायक कारनामे समोर येत आहेत. क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप आणि जलतरण प्रशिक्षक किरण शूरकांबळे यांनी विद्यापीठाचा जलतरण तलावच या भोंदू योगीबाबाच्या हवाली करून टाकला होता आणि पोहण्याचे प्रशिक्षण देण्याचे कुठलेही प्रशिक्षण नसलेला हा भोंदू बाबा मुलींना जलतरणाचे धडे द्यायचा, अशी धक्कादायक माहिती न्यूजटाऊनच्या हाती आली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा विभागात बाबाजी नावाने ओळखला जाणारा भोंदू योगीबाबा अनधिकृतपणे योगाचे वर्ग चालवत होता. क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप आणि जलतरण प्रशिक्षक किरण शूरकांबळे या दोघांनी विद्यापीठ प्रशासनाला अंधार ठेवून संगनमताने परस्पर या भोंदू योगीबाबाला विद्यापीठात योगाचे वर्ग घेण्याची परवानगी दिली होती.

हा भोंदू योगीबाबा योगवर्गाला आलेल्या विद्यार्थिनींशी गैरवर्तन करत होता. 'तुमचे नखरे झेलायला मी काय तुमचा नवरा आहे का?' अशी अर्वाच्च भाषा वापरून विद्यार्थिनींचा पाणउतारा करत होता. न्यूजटाऊनने या भोंदू बाबाचा पर्दाफाश केल्यानंतर त्याची विद्यापीठातील योगवर्गाची दुकानदारी बंद करण्यात आली आहे. मात्र या भोंदू बाबाचे कारनामे धक्कादायक कारनामे आता उघड होऊ लागले आहेत.

किरण शूरकांबळे हे विद्यापीठाचे पगारी जलतरण प्रशिक्षक आहेत. परंतु शूरकांबळे आणि जगताप या दोघांनी विद्यापीठाचा जलतरण तलावच या भोंदू बाबाच्या हवाली करून टाकला होता. पोहणे शिकवण्याचे कुठलेही अधिकृत प्रशिक्षण नसलेला हा भोंदूबाबा जलतरण तलावात उतरून मुलींना पोहणे शिकवायचा. त्यावेळी विद्यापीठाचे अधिकृत जलतरण प्रशिक्षक किरण शूरकांबळे मात्र गायब असायचे. तेथे लाईफ गार्डही नसायचे. या भोंदू योगीबाबाच्या हवाली किल्ल्याही करून टाकण्यात आल्या होत्या. अनेकवेळा तोच कुलपे लावून निघून जायचा.

धक्कादायक बाब म्हणजे हा भोंदूबाबा मुलींना पाण्यावर बसायला शिकवतो म्हणून त्यांच्याशी शारीरिक लगटही करायचा. हा सगळा धक्कादायक प्रकार दिवसाढवळ्या सुरू असताना विद्यापीठ प्रशासनाला मात्र त्याची खबरही लागली नाही. त्यामुळे डॉ. जगताप आणि शूरकांबळे यांनी संगनमताने सुरू केलेला भोंदू योगीबाबाचा खेळ गेल्या कित्येक महिन्यांपासून सुरूच राहिला.

काही वर्षांपूर्वी एमजीएम संस्थेच्या आवारातील जलतरण तलावात बुडून तरूण व्यापाऱ्याचा मृत्यू झाला होता. तेथे प्रशिक्षित लाईफ गार्ड असूनही ही दुर्घटना घडली होती. असे असतानाही विद्यापीठाच्या जलतरण तलावात पोहणे शिकवण्याचे कुठलेही अधिकृत प्रशिक्षण नसलेल्या खासगी व्यक्तीला मुलींना जलतरणाचे धडे देण्याची परवानगी कशी काय देण्यात आली? हा प्रश्नच आहे.

**भोंदू बाबा देत असलेले भाडे कोणाच्या खिशात ?**

न्यूजटाऊन या वृत्तसंस्थेने या भोंदू योगीबाबाच्या कारनाम्याचा पर्दाफाश केल्यानंतर प्रकुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे यांनी क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांना फैलावर घेत त्यांच्याकडे या सगळ्या प्रकाराबाबत विचारणा केली. तेव्हा हा भोंदू योगीबाबा विनामूल्य योग शिकवतो म्हणाला म्हणून आम्ही त्याला परवानगी दिली होती, असे त्यांना सांगण्यात आले. परंतु हा भोंदू बाबा क्रीडा विभागाच्या हॉलमध्ये योगवर्ग घेण्यासाठी भाडे द्यायचा. त्याच्या गैरवर्तनावर विद्यार्थिनींनी आक्षेप घेतल्यानंतर मी भाडे भरत होतो, त्यामुळे माझे कुणीच वाकडे करू शकत नाही, असे त्यानेच सांगितले.

मग हा भोंदू बाबा जर क्रीडा विभागात योगवर्ग घेण्याचे भाडे भरत होता, तर ते भाडे नेमके कोणाच्या खिशात जात होते? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

# चुके काळजाचा ठोका...

अगदी परवा whatsapp वर एक बातमी वाचली, १४ वर्षीय मुलगा घरातून class साठी गेला तो त्या दिवशी परतलाच नाही आणि काळजात धस्स झाले. मुलं तुमची असो की माझी त्यांच्या बद्दल च्या आई - बाबांच्या भावना ह्या कमी अधिक प्रमाणात सारख्याच असतात.

काय झाले? हा प्रश्न ही नको कारण २ पिढ्यामध्ये मतभेद हे होणारच.

मत जुळले नाही की वाद होतात, राग येतो, रागाच्या भरात नको ते शब्द तोंडातून निघतात, थोडक्यात काय की आपण दर्मीळ होतो आणि चर्चेचा मूळ मुद्दा बाजूला राहून भलत्याच दिशेने आई - बाबा आणि मुलांमधले भांडण जाते. ह्या भांडणाचे फलस्वरूप काही वेळ अबोला, कधी रागात स्वतःला खोलीत बंद करून घेणे, कुठे बाहेर निघून जाणे किंवा अगदी नकार पचवणे जमलेच नाही तर कधी कधी ही मजल आत्महत्या पर्यन्त ही जाऊ लागली आहे. आज पर्यन्त असे अनेक उदाहरण आपल्या आजूबाजूला आपण बघत असतो. समाजाचे हे चित्र पाहणे, काही काल हळहळणे, कालांतराने विसरणे आणि पुन्हा एखादा असा प्रसंग होतो तोपर्यन्त routine जीवन जगणे असा काहीसा बोथट जगण्याचा पॅटर्न आज आपण जगायला लागलो आहोत असे मला वाटते.

With all due respect to the said family मला as a psychologist & counsellor एकच विचार डोक्यात येत आहे की अश्या घटना कश्या avoid करता येतील? माझ्या मते रोजच्या जीवनात काही छोटे छोटे फरक जर आपण डोळसपणे केले तर हे टाळण्यासाठी मदत मिळू शकेल. सगळ्यात आधी हे बदल का करावे?

हा प्रश्न तुमच्या मनात येणे स्वभाविक आहे.

तर मुलं किशोरवस्थेत आली की त्यांच्या मध्ये होणाऱ्या शारीरिक बदलांचा त्यांच्या मानसिकतेवर काय परिणाम होतो हे जाणीवपूर्वक जाणून घेणे प्रत्येक आई - बाबा, परिवाराचे इतर सदस्य, शिक्षक आणि समाजाचे हिताचे ठरेल असे मला वाटते. ह्या वयात मुलांच्या विचारसरणीत खूप बदल होत असतात. त्यांना विविध प्रश्न पडत असतात. अश्यावेळी जर त्यांच्याशी आजूबाजूच्यालोकांनी संवाद साधला तर नक्कीच फायदा होऊ शकतो.

बरं संवाद म्हणजे --

तू आता मोठा झाला आहेस, हे कर, असे कर, तसे करू नकोस, तुला एवढे कळत नाही?

असे instructions म्हणजे संवाद नाही.

सगळ्यात आधी तर किशोरवस्थेतील मुलांचे ऐकणे, ऐकून घेणे म्हणजे प्रभावी संवाद साधने होय. त्यांच्या देहबोली कडे लक्ष ठेवणे, त्यातले सूक्ष्म बदल ओळखने, त्यांना बोलते करने, घरातल्या छोट्या छोट्या कामांबरोबरच निर्णयांमध्ये ही मुलांचा सहभाग करून घेणे महत्वाचे आहे.

ह्या वयात अभ्यास हा महत्वाचा आहेच पण ह्याच बरोबर मुलांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण (personality development) ही तितकीच महत्वाची असते हे आपण सर्वजण मान्य करतो.

मुलांचे व्यक्तिमत्व हे alround develop होण्यासाठी पालकांचे मुलांशी मनमुराद, मोकळे बोलणे , त्यांचे ऐकणे, त्यांना समजून घेणे, समजावून सांगणे मुलांच्या भावनिक स्वास्थ्यासाठी अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते.

मुलांशी अभ्यासाव्यतिरिक्त त्यांच्या आवडीनिवडी, मित्रमंडळी, स्वप्न, शरीरात होणाऱ्या बदलांबद्दल त्यांच्या मनात येणारे विचार, प्रश्न,शाळेतले वातावरण, शिक्षकांशी संवाद, समाज, त्यांच्या वयाला साजेल असे सामाजिक उपक्रम, healthy diet, exercise आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे खेळ ह्याबद्दल सतत, (वेळ मिळेल तेव्हा) चर्चा केली पाहिजे, brainstorming केले पाहिजे. आमच्यावेळी असे होते, आम्ही हे करायचो, ही वाक्ये आता replace करणं काहीसे जरुरी झाले आहे. आपण ही गोष्ट,, अशी केली तर त्याचे परिणाम असे होतील किंवा होऊ शकतात. काय वाटते तुला?

मुलाचे मत आपल्याला खूप काही शिकवते. आजची पिढी smart, हुशार and sensitive आहे. ह्या त्यांच्या गुणांचा नक्कीच आपण परिवार आणि समाजहितासाठी सकारात्मक उपयोग करवून घेऊ शकतो. दुसरे एक मला खास करून सांगावेसे वाटते की साधारण ९ -१० वी च्या मुलांना बहुतेक पालक खेळ सोडून पूर्ण फोकस अभ्यासावर करायला भाग पाडतात. आणि नेमके ह्याच वयात मुलांचे ह्ाृ लेवल पुप असते आणि खेळामधून ह्या energy }e positively channelise केले जाऊ शकते.

दुसरे म्हणजे research सांगते की माणसाच्या मेंदूचा जो भाग आपल्या शारीरिक हालचालींना control करतो तोच भाग learning and memory boost करतो. मग ही नैसर्गिक क्रिया जर आपण समजून घेतली तर लक्षात येईल की खेळणारा मूल अभ्यासात तेवढाच तरबेज, active होऊ शकतो. Science सांगते आहे, खेळल्याने मेंदूला देॅब्रुह पुरवठा वाढतो आणि आपल्या ज्ञान ग्रहण करण्याच्या शक्तीला वाढवतो. खेळण्याचे इतर अनेक फायदे सर्वश्रुत आहेत जसे - Team building, Leadership,

हार स्वीकारणे पुन्हा लढायला ( जिंकण्यासाठी ) तयार होणे -

इतरांच्या जीत मध्ये आनंदी होणे इतरांकडून शिकणे

इतरांना शिकवणे

Physical fitness,

Mental satisfaction, असे अनेक फायदे आहेत. तर आपण जर मुलांना रोज कमीतकमी १ तास खेळू दिले तर ह्या खेळण्याचा मुलांच्या सर्वांगीण विकासावर नक्कीच चांगला प्रभाव पडेल असे मला वाटते.

तरी पालक म्हणून, परिवार म्हणून आणि समाज म्हणून आपण नक्कीच आपल्या कोणत्याही वयाच्या मुलांशी खासकरून किशोरवस्थेतील मुलांशी परिणामकारक संवाद साधायला सुरवात करू आणि आपल्या मुलांचे भावविश्व जाणून घेण्याचा प्रयत्न करू. ही सदभावना.

# प्रलंबित मागण्यांसाठी उपमुख्यमंत्र्यांची भेट

**डॉ. दिनेश परदेशी यांचा पुढाकार**



वैजापूर, दि. १२ (प्रतिनिधी) - वैजापूर तालुक्यातील विविध प्रलंबित मागण्यांसाठी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस डॉ. दिनेश परदेशी यांच्या शिष्टमंडळाने पावसाळी अधिवेशनात मुंबई येथे मंत्रालयात राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी भाजपाचे राज्य सरचिटणीस संजय केणेकर, माजी जिल्हा परिषद सदस्य मधुकर वालुरे, सुनील पैठणपगारे, बाजार समितीचे संचालक कल्याण दांगोडे, ज्ञानेश्वर जगताप, मोहन आहेर, कैलास पवार, माजी पंचायत समिती सदस्य सुरेश राऊत उपस्थित होते.

खरीप हंगामात तालुक्यातील अनेक ठिकाणी पाऊस झालेला नाही. दुबार पेरणी करूनही शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची दाट शक्यता असल्याने पाऊस न पडलेल्या ठिकाणी दुष्काळ जाहीर करून अनुदान वितरित करणे. तालुक्यातील डोंगरथडी भाग हा कायमस्वरूपी दुष्काळग्रस्त भाग आहे. या भागातील ४० पेक्षा अधिक गावात पाणीटंचाई कायमस्वरूपी असतेच. म्हणून या भागात जायकवाडी जलाशयातून उपससिंचन योजनेद्वारे पाणी आणल्यास १२ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊ शकते. या योजनेसाठी सर्वेक्षण होणे अत्यंत गरजेचे आहे.

शिवना टाकळी मध्यम प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत व राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक येथे तातडीची बैठक लावणेबाबत प्रश्न मांडला. शिवना टाकळी मध्यम प्रकल्पाच्या दोन कालव्यापैकी उजवा कालवा वैजापूर तालुक्यातून जात असून त्याची लांबी साधारणतः ५५ किमी इतकी आहे. कालव्यावरील कामे करून पाणी शेवटच्या टोकापर्यंत नेण्यासाठी व सिंचन होण्याकरिता नवीन प्रस्तावित कामे करणे गरजेचे आहे. ही कामे झाल्यास शेतकऱ्यांना पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोचून ४००० हेक्टर क्षेत्र सिंचन होऊन १६ गावांचा पाण्याचा प्रश्न सुटेल. तसेच कालव्याचे अस्तरीकरण व वितरीकेचे कामे बाकी आहेत. शिवना नदीवरील पूर नियंत्रणाची कामे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार करणे गरजेचे आहे. असे केल्यास शेतीचे नुकसान होणार नाही. यामुळे नाशिक येथे राज्य तांत्रिक सल्लागार समितीची तातडीची बैठक घ्यावी.

लासुरगाव येथे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे कुलदैवत माता दाक्षायणी देवीचे मंदिर शिवना नदी काठावर आहे, देवीच्या दर्शनासाठी राज्यभरातून भाविक येत असतात. तसेच देवीची फार मोठी यात्रा दरवर्षी भरत असते लासुरगाव शिवना नदी काठावर असल्यामुळे दरवर्षी शिवना नदीच्या पुरामुळे गावात तसेच मंदिर परिसरात पुराचे पाणी प्रवेश करते व त्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक व मालमत्तेची हानी होत असते व गावकऱ्यांना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा सामना करावा लागतो. लासुरगावच्या ग्रामपंचायतीने या कारणामुळे गावास शिवना नदीच्या पुरापासून रक्षणासाठी गावाच्या हद्दीपर्यंत पूरसंरक्षक भिंत बांधून देण्याविषयी ठराव दिलेला आहे. य प्रस्तावावर तातडीने लक्ष देण्याची विनंती केली.

वाकला चांदेश्वर जलप्रकल्प (हत्तीघोडा) पुर्ण करण्यात यावे. वैजापूर तालुक्यातील वाकला चांदेश्वर जलप्रकल्प अत्यंत महत्वपूर्ण असुन प्रकल्प पुर्ण झाल्यास दुष्काळातही परिसरातील सर्व गावांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. तालुक्यातील वाकला गावाजवळ तापी खोऱ्यातील हत्तीघोडा नाल्यावर आहे. सदरील प्रकल्प वेळेत पुर्ण होणे अत्यंत गरजेचे असल्याने या प्रकल्पाबाबत पाठपुरावा केला. स्मार्ट सीटी अंतर्गत वैजापूर तालुक्यातील गावे हडसपिंपळगाव, घायगाव, जांबरगाव, लाखखंडाळा येथे स्मार्ट सिटी साठी होणारी प्रक्रिया थांबली असुन अनेक विकास कार्य ही थांबले आहे. म्हणून निवड झालेल्या वरील गावांचा स्मार्ट सिटी अंतर्गत होणारे कार्य तातडीने करण्याचे आदेश द्यावे अशा मागण्या करण्यात आल्या.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे), औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२१९९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायक्षेत्र)

### सर्वसमावेशक सल्लागार समिती बैठक

# महिलांचे हक्क संरक्षण व आर्थिक सक्षमीकरणासाठी सर्व विभागांचा समन्वय आवश्यक-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- समुपदेशन व कौशल्य विकासातून महिलांच्या हक्काचे संरक्षण व आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी सर्व विभागांच्या जिल्हास्तरीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

सर्वसमावेशक महिला सल्लागार समितीच्या बैठकीचे आयोजन आज जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी श्रीमती रेशमा चिमंद्रे, जिल्हा परिषदेच्या जिल्हा महिला बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक चंदनसिंग राठोड, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त पांडुरंग वाबळे, जिल्ह्यातील बालगृहांचे संस्थाचालक व महिला बालकल्याण विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक या बैठकीस उपस्थित होते.

बालकांचे समुपदेशन व शैक्षणिक पुनर्वसन करण्यासाठी बालगृहाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. जिल्ह्यामध्ये बालगृहाची परिस्थिती सुधारण्यासाठी बालगृहाच्या सुविधा अद्यावतीकरणाबाबतचा सर्वसमावेशक प्रस्ताव सादर करण्याची सुचना जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिली.

महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा उमेद, जिल्हा महिला बालविकास कार्यालय, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, पोलीस. न्यायालय, महाराष्ट्र उद्योजकता केंद्र यांच्यासह महसूल व इतर सर्व विभागाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महिला विकासाच्या व आर्थिक सक्षमीकरणाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी परस्परांमध्ये समन्वय आवश्यक आहे. महिलांच्या विकासासाठी त्यांची सुरक्षितता, कौशल्य विकास आणि त्याद्वारे आर्थिक सक्षमीकरण करणे आवश्यक आहे,असेही स्वामी यांनी सांगितले.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ याबाबत सादरीकरण करण्यात आले. तसेच विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.

अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ या कायद्याच्या अंमल बजावणीनुसार महिला बाल कल्याण विभागअंतर्गत महिला राज्यगृह, भरोसा सेल, बेघर महिलांसाठी तात्पुरता निवारा महिला राज्यगृह याबाबत माहिती देण्यात आली. छत्रपती संभाजी नगर मध्ये नूतन कॉलनी येथे सावित्रीबाई शासकीय महिला राज्यगृह असून येथे १८ते ६० वयोगटातील कौटुंबिक हिंसाचार ग्रस्त महिला, नैसर्गिक आपत्तीत बेघर झालेल्या महिला, विधवा, अनैतिक व्यापारातून सुटका झालेल्या महिला, एचआयव्ही बाधित महिला अशा महिलांना सहा महिने ते तीन वर्षापर्यंत आश्रय व निवाऱ्याची सोय उपलब्ध करून दिली जाते. तसेच प्रवेशितांच्या पुनर्वसनासाठी शासनामार्फत कायदेशीर सल्ला, समुपदेशन व अटी शर्तीच्या अधीन राहून अनाथ मुलींच्या लग्नासाठी आलेल्या स्थळाची चौकशी करून विवाह करून देण्यात येतात.

महिला समुपदेशन केंद्र जिल्ह्यात तीन तालुक्यांमध्ये स्थापन करण्यात आले असून येथे पैठण, सिल्लोड आणि



कन्नड या तालुक्यामध्ये हे तीन समुपदेशन केंद्र कार्यान्वित आहेत. महाराष्ट्र विकास केंद्र संच, साठे नगर, शिवाजी पुतळा जवळ पैठण, मातोश्री रमाबाई आंबेडकर महिला मंडळ भारत नगर संच समुपदेशन केंद्र पोलीस स्टेशन, सिल्लोड, महिला समुपदेशन केंद्र पोलीस स्टेशन आवार कन्नड येथे ही समुपदेशन केंद्र कार्यान्वित आहेत. महिलांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचारासंदर्भात समुपदेशन व मध्यस्थी करून प्रकरण निकाली काढले जातात. प्रसंगी पोलीस मदतही या प्रकरणात उपलब्ध करून दिली जाते.

सखी वन स्टॉप सेंटर माध्यमातून कौटुंबिक हिंसाचार ,लैंगिक अत्याचार ,शोषण ,बलात्कार, सायबर गुन्हा,अनैतिक व्यापार, ॲसिड हल्ला, बालविवाह, बाल लैंगिक अत्याचार आणि शोषण या संदर्भात कायदेशीर मदत सामाजिक समुपदेशन, वैद्यकीय मदत, पोलीस आणि तसेच तात्पुरता पाच दिवसाचा निवारा व पुनर्वसना साठी संस्थेकडे वर्ग करण्याचे काम केले जाते. सखी वन स्टॉप सेंटर अंतर्गत आतापर्यंत ५७६ महिलांना मदत करण्यात आली आहे. यामध्ये ३०० विवाहित जोडप्यांचे समुपदेशन करून कौटुंबिक पुनर्वसन करण्यात आले आहे. १५३ महिलांना तात्काळ तात्पुरत्या निवाऱ्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

# ‘चला जाणून घेऊ मतदान केंद्राला’

## मतदान केंद्र पुनर्रचना; नवीन स्थापना वेळेत करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- मतदारांना मतदान करणे सोईचे आणि सुलभ व्हावे, यासाठी मतदान केंद्रांची पुनर्रचना तसेच २०० हून अधिक सदनिका असणाऱ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये नवीन मतदान केंद्र स्थापन करण्याबाबतही आयोगाच्या सुचना आहेत. याबाबतचे नियोजन आणि कार्यवाही वेळेत पूर्ण व्हावे यासाठी ‘चला जाणून घेऊ या मतदान केंद्राला’ हा उपक्रम शनिवार दि.१३ व रविवार दि.१४ रोजी आयोजित करण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घोषित केले.

‘चला जाणून घेऊ या मतदान केंद्राला’, या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासंदर्भात आज नियोजन व आढावा घेण्यात आला.उपजिल्हा निवडणूक



अधिकारी देवेंद्र कटके, उपविभागीय अधिकारी चेतन गिरासे, व्यंकट राठोड, कन्नडचे तहसिलदार विद्याचरण कडावकर, गंगापूर तहसिलदार सतीश सोनी, संभाजीनगर तहसिलदार मुनलोड तसेच नगरपालिका मुख्याधिकारी उपस्थित होते. तर दूरदृष्यप्रणाली द्वारे उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नगरपालिका मुख्याधिकारी व बीएलओ सहभागी झाले होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की,‘चला जाणून घेऊ या मतदान केंद्राला’ हा उपक्रम दि.१३ व १४ जुलै रोजी जिल्हाभरात राबविला जाणार आहे. दि.१३ रोजी सकाळी ९ वाजेपासून या उपक्रमास सुरुवात होईल.शहरी भागात अप्पर आयुक्त मनपा, मुख्याधिकारी नपा आणि ग्रामिण भागात तहसिलदार व गटविकास अधिकारी यांच्यावर आयोजनाची जबाबदारी राहिल. बीएलओ, तलाठी, ग्रामसेवक यांच्यामार्फत उपस्थित सर्व मतदारांना मतदान केंद्राविषयी माहिती दिली जाईल.त्यात नकाशा व सादरीकरण करुन माहिती दिली जाईल. त्यानंतर मतदारांनी केलेल्या सुचनांमधून माहिती घेऊन मतदान केंद्रात बदल करण्याबाबतची माहिती तयार करुन नंतर प्रत्यक्ष पाहणी, पर्यायी व्यवस्था यांचा अहवाल तयार केला जाईल. यासर्व नोंदी घेऊन त्यावर मतदारांच्या स्वाक्षऱ्या घेण्याच्याही सुचना देण्यात आल्या आहेत.

मतदार, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी यांचे मतदार यादी, मतदान केंद्र याबाबत काही निवेदन असल्यास ते ही स्विकारण्याचे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले. याबाबत बीएलओ, तलाठी, ग्रामसेवक यांचे प्रशिक्षणही आजच घेण्यात आले. तहसिलदार किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यास्तरावर दि.१४ पर्यंत मतदान केंद्रांबाबतचे अहवाल प्राप्त करुन घ्यावे दि.१५ रोजी त्यावर सोपस्कार करुन प्रस्ताव निवडणूक आयोगाला सादर करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

# ‘मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण’ योजनेचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

## योजनेची पारदर्शक व गतिमान अंमलबजावणी करा -विभागीय आयुक्त दिलीप गावडे

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- राज्य शासनाने ’मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण’ योजना संपूर्ण राज्यात सुरु केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विभागात सर्वत्र नाव नोंदणी व अर्ज सादर करण्यासाठी महिलांचा प्रतिसाद दिसून येत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक दाखल्यांसाठी महिलांना सहकार्य करावे तसचे



विभागातील प्रत्येक जिल्ह्यात योजनेची पारदर्शक व गतिमान अंमलबजावणी करा, असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी यंत्रणेला दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने’ बाबत विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपायुक्त सुरेश बेदमुथा, नगरपालिका प्रशासन सहआयुक्त देविदास टेकाळे, महिला व बाल विकास विभागाचे प्रभारी उपायुक्त गणेश पुंगळे उपस्थित होते.

’मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण’ योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, अर्ज भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आल्यास याबाबतची तक्रार आपल्या जिल्हाधिकाऱ्यांकडे करावी. योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. योजनेच्या अंमल बजावणीत त्यांची भूमिका महत्त्वाची राहणार असल्याचे विभागीय आयुक्त श्री गावडे म्हणाले. त्याचबरोबर योजनेसंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे किंवा फॉर्म भरुन देण्याचे निमित्त करुन निर्माण होणारे दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. असेही त्यांनी सांगितले.

योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. महिलांना नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने नियोजन करावे. महिलांची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचना श्री. गावडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

(पान १ वरुन)

### विधान परिषद निवडणूकीत...

मिळवला. त्यामुळे काँग्रेसची ८ मतं फुटल्याची जोरदार चर्चा आहे.

विधानपरिषद निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा विजय अनेक अर्थांनी भाजपसाठी महत्त्वाचा आहे. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यापासून पंकजा मुंडे महाराष्ट्राच्या राजकारणापासून दूर होत्या. त्यामुळे त्यांचे समर्थक नाराज होते. लोकसभा निवडणुकीतही त्यांचा पराभव झाला होता. त्यामुळे मराठवाड्यातील मुंडे समर्थक दुखावले होते. मात्र, आता विधानपरिषद निवडणुकीत विजय मिळाल्याने पंकजा मुंडे यांची महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एन्ट्री झाली आहे.

लोकसभेच्या निकालानंतर आत्मविश्वास दुणावलेला ठाकरे गट आणि शरद पवार गट महायुतीची मतं फोडेल, अशी अपेक्षा होती. त्यामुळे विशेषत: अजितदादा गटाच्या उमेदवारांना धोका असल्याची चर्चा होती. मात्र, शरद पवार गटाला अजितदादा गटाचे एकही मत फोडण्यात यश आले नाही. तर उद्धव ठाकरे यांनाही शिंदे गटाची मतं फोडण्यात अपयश आले. यामुळे मविआचे तिसरे उमेदवार असणाऱ्या जयंत पाटील यांचा पराभव झाला.

या विधानपरिषद निवडणुकीत भाजपचे एकूण पाच उमेदवार विजयी झाले आहेत. त्यामुळे आता भाजपची यंग ब्रिगेड विधानपरिषदेत दिसणार आहे. भाजपचे योगेश टिळेकर, परिणय फुके, पंकजा मुंडे आणि अमित गोरखे यांचा विजय झाला. अमित गोरखेंच्या रूपानं मातंग समाजातील तरूण चेहरा विधानपरिषदेत दिसणार आहे. तर योगेश टिळेकर यांच्या माध्यमातून माळी समाजाला विधानपरिषदेत प्रतिनिधित्व मिळाले आहे. याशिवाय, सदाभाऊ खोत यांच्या रूपात शेतकरी आणि चळवळीत कार्यकर्ता पुन्हा आमदार झाला आहे.

### फडणवीसांना तुरुंगात..

नेत्यांचं सुडाचं राजकारण होतं.’

मुख्यमंत्री शिंदे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते नाना पटोलेंचा उल्लेख करत महाविकास आघाडीच्या नेत्यांना उद्देशून म्हणाले, ‘तुम्ही लोक मंत्री गिरीश महाजन यांना तुरुंगात टाकणार होतात. देवेंद्र फडणवीस यांचा चौथा नंबर होता. अनेकांना पटणार नाही. परंतु, सर्व गोष्टी पडद्यामागे घडत होत्या. मी आणि अजित पवार त्या लोकांना रोखू पाहत होतो. असं करू नका म्हणून सांगितलं होतं. परंतु, त्यांनी आमचं काही ऐकलं नाही. मी या लोकांना सांगायचो, वर (दिल्लीत) दोन जण (पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शाह) बसलेत, त्यांचा बुलडोझर येईल.’

### महायुती सरकारने राज्याची...

दरम्यान, अजित पवारांनी अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसंदर्भातही विजय वडेट्टीवार यांनी टीका केली. ‘वर्षभरापूर्वी बहिणीची आठवण आली नाही का? सरकारचा कार्यकाळ संपताना बहीण सुचली. कारण महाराष्ट्राच्या जनतेनं यांची जिरवली. व्वा रे. यांचं रामभरोसे हिंदू हॉटेल बंद झालं. रामाचं नावच घेऊ शकत नाहीत. कारण अयोध्येत कुचकून कुचकून मारलंय यांना. साफ करून टाकलं. रामटेकमध्ये काय दाखवत होते तर धनुष्यबाण. तिथे जिरवलं. रामेश्वरममध्येही जिरवलं. चित्रकूटमध्येही जिरवलं. भगवान रामही म्हणाले. माझं नाव घेऊन मतं मागता, माझ्या नावावर राजकारण करता. बजरंगबली उभा राहिला, काढली गदा आणि यांची पाठ सुजेपर्यंत मारलं. म्हणून आता हे वठणीवर आले आहेत. म्हणून नवीन योजना सुरू केल्या’, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधारी भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यावर केली.

‘२०२३-२४ मध्ये राज्यावर ७ लाख ११ हजार कोटींचं कर्ज होतं. यावर्षी १ लाख ३० हजार कोटींचं कर्ज काढत आहेत. ऋण काढून सण साजरा करणारे तुम्ही आहात. महाराष्ट्र हे बघतोय. मला अपेक्षा होती की राज्यपालांचं भाषण फार गांभीर्याने होईल. पण त्या भाषणात तसं काही नव्हतं’, असं वडेट्टीवार म्हणाले.

‘मुख्यमंत्री फार खरं बोलणारे होते. एवढं खोटं बोलत नव्हते. पण दिल्लीच्या सवयीमुळे हे असं झालंय. राज्यपालांच्या भाषणावरच्या भाषणाची गाडी सुसाट होती, पण ट्रॅक सोडून चालली होती. मुख्यमंत्र्यांच्या भाषणावेळी शिंदे गटाचे सगळे लोक गंभीर होते, पण भाजपाचे लोक जोरात हसत होते. त्या भाषणाला हास्यजत्रेचं स्वरूप होतं. इथून गाडी थेट नेहरूंपर्यंत घेऊन गेले. तिथून युक्रेन आणि रशियाच्या युद्धापर्यंत घेऊन गेले. जे मणिपूर शांत करू शकले नाहीत, त्यांच्या नावाने युक्रेन-रशिया युद्धबंदीपर्यंत ते गेले’, असा टोला विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या भाषणातून लगावला.

### सरकारने दिलेले १० टक्के...

आता १० टक्के दिले आहे. लोकसंख्या वाढत असताना मात्र दिल्या जाणाऱ्या आरक्षणाचा टक्का कमी केला जात आहे. आताचे आरक्षण चांगले आहे. परंतु, आताचे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत नसल्याने ते टिकणार नाही. त्यामुळे सगेसोयरे अध्यादेशाची अंमल बजावणी करावी, ज्यांच्या नोंदी सापडल्या त्याच्या आधारे राज्यातील मागेल त्या मराठा बांधवाला कुणबी प्रमाणपत्र द्यावे, हैदराबाद संस्थान, सातारा संस्था, बॉम्बे गव्हर्मेंटचे गॅझेट लागू करावे, ८३ क्रमांकावर कुणबी व मराठा एकच आहे त्याचा आधार घेवूनच कायदा केला आहे. त्या कायद्यातील अटीशर्थी कमी करून सुलभता आणावी, अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली.

### मनोज जरांगेंना २८८....

पाठवायचे असेल तर या सर्व २८८ आमदारांना पाडले पाहिजे. आरक्षण भूमिका मांडणारे तरुण निवडून गेले पाहिजेत, असे म्हणत हाके यांनी जरांगे यांच्या सुरात सूर मिसळला.

आज लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे दोन्ही नेते सांगोला तालुक्यात आले असता त्यांचे येथील ओबीसी बांधवानी फटाके फोडत आणि हलग्यांच्या कडकडाटात जोरदार स्वागत केले. सांगोला हा हाके यांचा तालुका असून ते आज आपल्या गावाकडे आईवडिलांना भेटायला जाताना सांगोला येथे थोडा वेळ थांबले होते. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

### हाथरस चेंगराचेंगरीप्रकरणी...

चेंगराचेंगरीप्रकरणी संबंधित उच्च न्यायालयात जाण्याची मुभा दिली. “संविधानाच्या २२६ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा वापर करून सक्षम उच्च न्यायालयाकडे जाण्याचे स्वातंत्र्य आहे”, असे न्यायालयाने आदेश दिले.

हाथरस येथे २ जुलै रोजी सूरज पाल उर्फ नारायण साकार हर यांच्या सत्संगमध्ये चेंगराचेंगरी झाली. या घटनेत तब्बल १२१ लोकांचा मृत्यू झाला. अधिवक्ता विशाल तिवारी यांनी दाखल केलेल्या तात्काळ जनहित याचिकामध्ये या घटनेची चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली पाच सदस्यीय तज्ज समिती नेमण्याची मागणी केली होती.

उत्तर प्रदेश राज्याला या घटनेचा स्टेटस रिपोर्ट सादर करण्याचे निर्देश द्यावेत आणि संबंधितांवर त्यांच्या निष्काळजी वर्तनासाठी कायदेशीर कारवाई सुरू करावी अशी विनंती या याचिकेतून न्यायालयाला केली होती. भविष्यात अशा घटना टाळल्या जातील याची खात्री करण्यासाठी, मोठ्या संख्येने सार्वजनिक मेळावे असलेल्या प्रकरणांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यासाठी राज्य सरकारांना निर्देश देण्याचीही मागणी या याचिकेमार्फत केली होती.

# मंगळसूत्र चोराच्या धक्क्याने वृद्ध महिला जखमी; रक्तबंबाळ महिलेला हेल्प रायडर्सने केली मदत

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरता न आल्याने चोरट्यांनी महिलेच्या हातातील मोबाईल हिसकावून पळ काढला. यावेळी चोरट्यांनी महिलेला धक्का दिल्याने त्या खाली पडल्या. यात महिला गंभीर जखमी झाल्याची घटना छत्रपती संभाजीनगरमधून समोर आली आहे. गंभीर जखमी अवस्थेतील महिलेला हेल्प रायडर्सने तत्काळ मदत केली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की, छत्रपती संभाजीनगरमधील पुंडलिक नगर रोडवर एसार पेट्रोल पंप समोर शुक्रवारी सकाळी ६.४५ वाजेच्या सुमारास मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या एका ७५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरण्याचा प्रयत्न चोरांकडून झाला. यामध्ये त्या आजीच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरता आले नाही म्हणून दुचाकीवर आलेल्या चोराने आजीच्या हातातील मोबाईल हिसकावत आजीला धक्का देत पळ काढला त्यामुळे आजी खाली रस्त्यावर पडल्या व त्यांच्या डोक्याला मार लागला व आजीच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरू झाला. हे होत असताना काही महिला व रस्त्यावरील लोक तिथं होते त्यांनी आजीला आधार देण्याचा प्रयत्न केला तेव्हाच ॲम्ब्युलन्स हेल्प रायडर्स संस्थेच्या परिवारातील सक्रिय सदस्य पवन भिसे हा तिथून जात असताना त्याने हा प्रसंग पाहिला व लागलीच त्यावरून जाताना एक रिक्षा थांबवली व त्वरित त्या आजीला रिक्षात बसवून जवळील हेडगेवार हॉस्पिटल मध्ये घेऊन गेला. त्यावेळी तेथे गेल्यावर रक्त बंबाळ झालेल्या आजीला बघून दवाखान्यातील डॉक्टरांनी आजीवर त्वरित उपचार सुरू केले तसेच तेवढ्या वेळेत हेल्प रायडर्स पवन याने आजीची विचारपूस करत आजीच्या मुलाला जो पुण्यात असतो त्याला याबाबत कळवले. आता आजीची तब्येत बरी आहे परंतु डोक्याला मार खूप जोरात लागला असल्याने आजी दवाखान्यात आहेत.

# वाळूजच्या वडगाव येथे युवकाची निर्घृण हत्या

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील वाळूज परिसरातील वडगाव येथील खदानीजवळ ३० वर्षीय तरुणाचा दगडाने डोके ठेचून खून करण्यात आल्याची घटना शुक्रवारी (दि.१२) सकाळी उघडकीस आली. शैलेश विठ्ठल दौंड (३० रा. आर.एच. ३१, एफडीसी हौ.सो. बजाजनगर) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याविषयी मिळालेल्या माहितीनुसार, शैलेश हा आई-वडील तसेच पत्नी सोबत बजाजनगर येथे राहत असे. त्याचे एमबीएपर्यंत शिक्षण झाले असून तो वाळूज येथील एका नामांकित कंपनीत एच आर विभागात नोकरीला होता. काही दिवसापूर्वी कंपनीतील जॉब सोडल्याने तेव्हा पासून तो घरीच होता. तर शैलेशचे वडील एफडीसी कंपनीत कामाला असून त्याची आई घरीच असते.

गुरुवारी सकाळी वडगाव येथील जल कुंभालगत असलेल्या खदानीजवळून रस्त्यांनी जाणाऱ्या महिला कामगारांना रक्ताच्या थारोळ्यात एक जण बेशुद्ध अवस्थेत पडलेला दिसून आला. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली

दरम्यान या घटनेची माहिती पोलिसांना मिळाली होती. यावरून सहाय्यक पोलीस आयुक्त महेंद्र देशमुख, पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे, पोलीस उपनिरीक्षक संदीप शिंदे, अशोक इंगोले यांच्यासह कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता त्यांना वडगाव येथील गट नंबरकडे जाणाऱ्या रस्त्यावर शैलेश याचे डोके दगडाने ठेचलेले दिसले. त्याचा मृतदेह रस्त्याच्या कडेला पडलेल्या कचऱ्यात फेकल्याचे दिसले.